महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे सरंक्षण अधिनियम, १९९९ च्या प्रभावी अंमलबजावणी बाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: एमपीआय-१११७/प्र.क्र. ९७५ /पोल-११

दुसरा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई
तारीख: २९ सप्टेंबर, २०१७

वाचा :-

शासन परिपत्रक क्र. एमपीआय-२०१३/प्र.क्र. १४१६/पोल-११, दिनांक ५.४.२०१४

परिपत्रक

अवास्तव परताव्याचे आमीष दाखवून, आकर्षक व्याज, लाभांश, फायदा किंवा अन्य स्वरुपातील कोणत्याही प्रकारचे फायदे दाखवून निश्चित केलेल्या मुदतीत फायद्यासह ठेव परत करण्याच्या अटीवर अनेक कंपन्या गुंतवणूकदारांकडून ठेवी स्विकारतात. मुळातच अशा प्रकारे अवास्तव व्याज देणे शक्य नसते. मात्र, आकर्षक व्याजदर व गुंतवणूकीवर मिळणाऱ्या परताव्याचे आमिष दाखवून अनेक कंपन्या गुंतवणूकदारांकडून ठेवी स्विकारुन कालांतराने अवास्तव परतावा देणे शक्य नसल्याने गुंतवणूकदारांची फसवणूक करतात, असे अनेक प्रकरणी शासनाच्या निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ४ (१) (दोन) मधील तरतूद पुढील प्रमाणे आहे :-

कोणतीही वित्तीय संस्था ठेवीदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने त्यांच्या हितसंबंधास हानीकारक ठरेल अशा रितीने बुध्दिपुरस्परपणे काम करीत आहे असे शासनाला सकारण वाटत असेल; तर त्याबाबतीत-

आणि अशी वित्तीय संस्था ठेवी परत करण्याची किंवा आश्वासन दिलेले व्याज किंवा इतर लाभ देण्याचा किंवा ज्यांच्या बदल्यात ज्या ठेवी स्विकरण्यात आल्या त्या सेवा पुरविण्याची शक्यता नाही अशी शासनाची खात्री पटली असेल तर, शासनास, अशा वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांची कारणे लेखी नमूद केल्यानंतर, अशा वित्तीय संस्थेने गोळा केलेल्या ठेवीमधून स्वतःच्या नावाने किंवा कोणत्याही अन्य व्यक्तिच्या नावाने संपादन केला असल्याचा मानण्यात येणारा पैसा किंवा अन्य मालमत्ता किंवा असा पैसा किंवा अन्य मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवीची परतफेड करण्यासाठी पुरेशी नाही असे त्यास दिसून आले तर, उक्त वित्तीय संस्थेची किंवा तिचा प्रवर्तक, संचालक, भागीदार किंवा व्यवस्थापक किंवा सदस्य यांची शासनाला योग्य वाटेल अशी अन्य मालमत्ता जप्त करण्याचा आदेश, तो आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन देता येईल.

सदरहू कायद्यातील उक्त तरतूदीच्या अनुषंगाने अशा वित्तीय संस्था संदर्भात, ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षणाच्या दृष्टीने, ग्राहक/ठेवीदारांच्या तक्रारीची प्रतिक्षा न करता आणि योजना बंद होण्याची वाट न पाहता अशा वित्तीय संस्थांसंदर्भातील अहवाल शासनास जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सादर करण्याच्या सूचना सर्व पोलीस घटक प्रमुख यांना वरील वाचा येथील परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, याअनुषंगाने कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सबब, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील उक्त नमुद तरतुदींचा वापर अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या अशा वित्तीय संस्थाची माहिती जतन करावी. तसेच अशा वित्तीय संस्थाच्या वतीने ठेवी स्विकारण्यासाठी करण्यात येणाऱ्या जाहिरातीवर देखरेख ठेवावी व कोणतीही संस्था हि ठेवीदारांच्या हितसंबंधास हानीकारक ठरेल, अशा रीतीने काम करत आहे अथवा ठेवीदारांची फसवणुक करण्याच्या इराद्याने काम करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा वित्तीय

संस्थाविरुद्ध प्रस्तुत कायद्याच्या प्रचलित तरतुदी नुसार तात्काळ कार्यवाही करावी व जिल्ह्याच्या विशेष शाखेस ह्या संदर्भात लक्ष ठेवण्याबद्दल सुचित करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२९१११३६१९०८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yuvraj B Ajetrao

Digitally signed by Yuvraj B Ajetrao
DN: CN = Yuvraj B Ajetrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2017.09.29 16:15:38 +05'30'

(युवराज ब. अजेटराव)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व पोलीस आयुक्त
३. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
४. सर्व जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी
५. सह पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई
६. पोलीस उप महानिरीक्षक (आर्थिक गुन्हे शाखा), राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
७. सर्व पोलीस अधिक्षक
८. पोलीस उप अधिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा (सर्व जिल्हे)
९. निवड नस्ती पोल- ११